# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र.- ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०२०/ ६१६

दिनांक 24 FEB 2020

प्रति,

उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड

पु.ला.शा.तं.लातूर,.म.नि.लातूर

**विषय:-** शासकीय पत्राचा नमुना विहित करणे तसेच त्यावर बोधचिन्ह (Logo)/घोषवाक्य (Tagline)/मुद्रित करण्याबाबतचे धोरण.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५५/१८(र.व.का.) दिनांक १५ फेब्रुवारी, २०२०

उपरोक्त शासन परिपत्रकानुसार शासकीय पत्राचा नमुना विहित करणे तसेच त्यावर बोधचिन्ह (Logo)/घोषवाक्य (Tagline)/मुद्रित करण्याबाबतचे धोरण निश्चित केलेले आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सोबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५५/१८(र.व.का.) दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० या शासन परिपत्रकाची प्रत जोडली असून त्यानुसार पत्रव्यवहाराचा विहित नमुना वापरणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

सोबत:-शासन परीपत्रक

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:- १) या कार्यालयातील/आस्था-१/गोपनिय विभाग/शिक्षण विभाग/आस्था-२/लेखा/रोखा/वैद्यकीय विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/भांडार विभाग यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

२) या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

**शासकीय पत्राचा नमुना विहित करणे तसेच त्यावर बोधचिन्ह (Logo) / घोषवाक्य (Tagline) <u>मुद्रित करण्याबाबतचे धोरण.</u>**

## महाराष्ट्र शासन
### सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण – २०१८/प्र. क्र.१५५/१८(र.व का.)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५ फेब्रुवारी, २०२०.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. [illegible]
आवक क्र. 1357
दिनांक 17 FEB 2020

<u>वाचा</u> : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : केमाअ २०११ / ४०८/ प्र. क्र. २२९ / सहा, दिनांक २२ नोव्हेंबर, २०११.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र. क्र.४७/१८ (र. व का.), दिनांक २४ जून, २०१५.

३) The Information Technology Act, 2000

**<u>प्रस्तावना :</u>**

कार्यालयीन कामकाज नियमपुस्तिका नियम १०२ अन्वये, केंद्र शासन, खाजगी व्यक्ती, राज्य शासनाचे अधिकारी यांना शासनामार्फत पाठवावयाच्या पत्रांसाठी वेगवेगळे नमुने विहित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २४ जून, २०१५ च्या परिपत्रकान्वये, शासकीय पत्रव्यवहार करताना पत्रावर कार्यालयाचा संपूण पत्ता लिहिणे, दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, ई-मेल आयडी इ. लिहिण्याबाबतच्या सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रिय कार्यालयांकडून निर्गमित होणाऱ्या पत्रांच्या नमुन्यामध्ये कोणतीही एकवाक्यता नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. याशिवाय शासकीय पत्रांवर बोधचिन्ह व घोषवाक्य मुद्रित करण्याबाबतचे कोणतेही धोरण / सूचना नसल्याने विविध मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील राज्य शासकीय कार्यालयांच्या पत्रांवर बोधचिन्ह / घोषवाक्य मुद्रित करण्याबाबतचे धोरण निश्चित करणे तसेच पत्राचा नमुना विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>परिपत्रक :</u>**

सदर परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, सर्व मंत्रालयीन विभाग तसेच विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कार्यालयांनी यापुढे सोबतच्या **नमुना "अ"** मध्ये विहित केलेला पत्राचा नमुना पत्रव्यवहारात वापरावा. याकरीता महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर (Home Page) "इतर दुवे" या शीर्षाखाली उपलब्ध करून देण्यात आलेल्या Template चाच पत्राचा नमुना म्हणून उपयोग करण्यात यावा.

२. यापुढे उपरोक्त विहित केलेल्या पत्राच्या नमुन्यावर मंत्रालयीन विभागांनी कोणतेही बोधचिन्ह / घोषवाक्य वापरू नये. तथापि विविध सेवांच्या अनुषंगाने जनतेशी संपर्क असणाऱ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील राज्य शासकीय कार्यालयाचे स्वतंत्र बोधचिन्ह / घोषवाक्य असल्यास असे बोधचिन्ह वा घोषवाक्य विहित नमुन्यावरील राजमुद्रेच्या डाव्या बाजूस सोबतच्या **नमुना "अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुद्रित करुन वापरता येईल. (उ.दा. महाराष्ट्र पोलिस दलाचा लोगो पोलिसांशी संबंधित कार्यालयांच्या लेटरहेडवर छापता येईल.)

३. राज्य सेवा हक्क आयोग त्यांचे पत्रावर राज्य सेवा हक्क आयोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य मुद्रित करून वापरू शकतील. तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या तरतूदीनुसार देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रांवरसुद्धा राज्य सेवा हक्क आयोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य मुद्रित करून वापरता येईल.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिताचे बोधचिन्हसुद्धा सर्वच विभाग / कार्यालयांच्या पत्रांवर न छापता राज्य माहिती आयोगाचे पत्र तसेच माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडून निर्गमित करण्यात येत असलेल्या पत्रांवर राजमुद्रेच्या डाव्या बाजूला मुद्रित करुन वापरण्यात येतील.

५. State Emblem of India (Regulation of Use) Rules, 2007 च्या नियम ६(२) अनुसार शासकीय तसेच अर्धशासकीय पत्रांमध्ये राजमुद्रा मुद्रित करताना ती पत्राच्या मध्यभागी असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत अर्धशासकीय पत्रांमध्ये राजमुद्रा ही डाव्या बाजूला मुद्रित असल्याचे दिसते, ही बाब अनुचित ठरते. सबब यापुढे अर्धशासकीय पत्रांवर राजमुद्रा मुद्रीत करताना ती सोबतच्या **प्रपत्र "ब"** प्रमाणे असेल याची संबंधित स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी याग्य ती दक्षता घ्यावी. तसेच अर्धशासकीय पत्रावरही त्या कार्यालयाच्या संपूर्ण पत्त्यासोबत ई-मेल आयडी व दूरध्वनी क्रमांकही नमूद करण्यात यावा.

६. याशिवाय राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील स्वायत्त संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, कंपन्या तसेच सहकारी संस्था यांनी त्यांचे पत्र तसेच अर्धशासकीय पत्रे यांवर "महाराष्ट्र शासन" असा उल्लेख करू नये. तथापि वैधानिक विकास महामंडळांची स्थापना भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७१ (२) अनुसार राज्यपालांच्या निदेशानुसार झालेली असल्याने त्यांचे पत्रांवर "महाराष्ट्र शासन" असा उल्लेख करता येईल.

७. कार्यालयीन कामकाज नियमपुस्तिकेमध्ये भारत सरकार, खाजगी व्यक्ती तसेच राज्य शासकीय अधिकारी यांचेसाठी विहित करण्यात आलेल्या पत्रांच्या विविध नमुन्यांऐवजी आता **नमुना "अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकाच नमुन्यामध्ये पत्रे पाठविण्यात यावीत.

८. अर्धशासकीय पत्रे व खर्चास मंजूरी द्यावयाची ज्ञापने वगळता मंत्रालयातील इतर शासकीय पत्रे, आदेश, ज्ञापने इ. Digital Signature करून निर्गमित करण्यात यावीत.

९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग / कार्यालयांना सूचित करण्यात येते की ,उक्त परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१०. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक **२०२००२१५१३२८३६६६०७** असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SHRIRAM DATTATRAYA YADAV
Date: 2020.02.15 13:38:54 +05'30'

**( श्रीराम यादव )**

**उप सचिव**

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,

२.सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,

३.मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),

४.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव (५ प्रती),

५.मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव (५ प्रती),

६.मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,

७.मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,

८.मा.महाअधिवक्ता,महाराष्ट्र राज्य

९.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,

१०.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती),

११.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,

१३.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (२ प्रती),

१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१५.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,

१६.मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई,

१७. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

१९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०

२०. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन,टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५.
२१. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१.
२२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८.
२३. बहुजन समाज पार्टी,डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.
२५. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई.
२६. सर्व मंत्रालयीन विभाग
२७. सर्व विभागीय आयुक्त,
२८. सर्व जिल्हाधिकारी,
२९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३०.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
३१.निवड नस्ती.(कार्यासन-१८)

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८ / प्र. क्र. १५५ / १८ (र.व का.), दिनांक १० फेब्रुवारी, २०२० चे सहपत्र.

## नमुना "अ"

बोधचिन्ह

घोषवाक्य

**महाराष्ट्र शासन**

------------ विभाग,

दूरध्वनी क्र .....................

Email ID : .......................

मंत्रालय (मुख्य इमारत) / मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ---,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

---

क्रमांक : ..................................................        दिनांक : ......................

प्रति

......................

......................

......................

**विषय :**

**संदर्भ :**

महोदया / महोदय,

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

आपली / आपला,

**(संबंधित अधिकाऱ्याचे नाव)**

**पदनाम**

सूचना :

अ) वरील राजमुद्रेच्या खालील जागेत क्षेत्रिय कार्यालयांनी दिनांक २४ जून, २०१५ च्या परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन मंत्रालयीन विभागाऐवजी त्यांच्या कार्यालयाचे नाव व त्यांच्या कार्यालयाचा पत्ता मुद्रित करावा.

आ) बोधचिन्ह / घोष वाक्य असल्यास परिपत्रकातील सूचनेप्रमाणे वापरावे.

इ) संबंधित अधिकाऱ्याचे नाव लिहिताना खालील तक्तात दर्शविण्यात आलेल्या उदाहरणानुसार नाव लिहिण्यात यावे.

| अधिकाऱ्याचे नाव | नाव लिहिण्याची योग्य पद्धत |
|---|---|
| **पुरुष अधिकारी** | |
| श्री. संजय रामचंद्र पवार | सं. रा. पवार |
| **महिला अधिकारी** | |
| श्रीमती पोर्णिमा प्रकाश पाटील | पोर्णिमा पाटील किंवा पोर्णिमा प्र. पाटील |

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८ / प्र. क्र. १५५ / १८ (र.व का.), दिनांक १० फेब्रुवारी, २०२० चे सहपत्र.

नमुना "ब"

अ.शा. पत्र क्र:
कार्यालयाचे नाव व पत्ता
दूरध्वनी क्रमांक :
ईमेल :
दिनांक :

अधिकाऱ्याचे नाव
पदनाम

**विषय :**

प्रिय / महोदय / महोदया,

आपला / आपली,

**(अधिकाऱ्याचे नाव)**

प्रति

...............................................

...............................................

...............................................